tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com

# अमरावती महानगरपालिका अमरावती

## ( महिला व बालविकास विभाग )

## ई निवीदा सुचना - ( मनपा स्वनिधी अंतर्गत )

क्र –अमनपा/ मबावि/ईनिसु/362/2023
दि. 09 /08 /2023

मा आयुक्त यांचे वतीने अमरावती महानगरपालिका, महिला व बालविकास विभागा अंतर्गत खालील कामाकरीता स्थानीक (अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील ) व या क्षेत्रात कार्यरत प्रशिक्षण संस्थांकडुन ई निवीदा मागविण्यात येत आहे.

| क्र | कामाचे नाव | बयाना रक्कम / EMD - 1 % ( निवीदा दाखल करतेवेळी ) | सुरक्षा रक्कम - 3 % (कराराराननामा करतेवेळी मंजुर दराचे 3 टक्के ) | कोऱ्या निवीदा फॉर्मची किंमत रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 |
| 1 | अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मुली / युवतींना विवीध प्रकारचे वाहन चालक प्रशिक्षण व (लायसन्स) अनुज्ञाप्ती देणे. | 16,000/- | 48,000/- | 500/- + 90 (18 % GST ) = 590 एकुण | (कार्यादेशा नुसार ) |

| ई निवीदा प्रसिद्दधी | | कालावधी |
|---|---|---|
| ई निवीदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ | (Start) | दि04 / 8 /2023, दु 4 वाजेपासुन |
| ई निवीदा दस्ताऐवज डाउनलोड संमाप्त | (End) | दि18 / 8 /2023, दु 12 वाजेपर्यंत |
| ई निवीदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | (Start) | दि04 / 8 /2023, दु 4 वाजेपासुन |
| ई निवीदा दाखल करण्याची अंतीम दिनांक | (End) | दि.18 / 8 /2023, दु 12वाजेपर्यंत |
| ई निवीदा उघडण्याचा [redacted] दिनांक | (Technical) | दि.18/ 8 /2023, दु 4 वाजता (शक्य झाल्यास) |
| (Financial) ईनिवीदा उघडण्याचा दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल. | | |

निवीदेच्या अटी / शर्ती व सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर पाहता येईल.

महिला व बालविकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

विशेष कार्य अधिकारी
महानगरपालिका अमरावती

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com
2021.10.10 09:52
Scanned with OKEN Scanner

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com

1. निवीदेच्या अटी / शर्ती व सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर पाहता येईल
2. नोंदणीकृत संस्था/ कंमनी/निवीदाधारक / फर्म यांनी अधिकृत DSC प्राप्त करुन http://www.mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर नोंदणी करुन केवळ ईनिवीदा पद्धतीनेच निवीदा सादर करावी.
3. को-या निवीदा फॉर्मची रक्कम व बयाना रक्कम चा ऑनलाईन पेमेंट गेटवे वरुनच भरणा करावा.

(B-1) – आवश्यक कागदपत्रे

1 संस्था / फर्मचे RTO ( प्रादेशीक परीवहन अधिकारी ) कार्यालयामध्ये चालक प्रशिक्षण संस्था म्हणुन नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र .

2 GST प्रमाणपत्र ( लागु नसल्यास पुरावा जोडावा)

3 संस्थेचे मागील 03 वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल अथवा संचालकाचे 03 वर्षाचे ITR प्रमाणपत्र

4 दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक ( Shop – Act License)

5 संस्था / फर्मकडील प्रशिक्षणनिहाय वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र .

6 प्रशिक्षणासंबंधी आवश्यक यंत्रसामुग्री व प्रशिक्षीत प्रशिक्षक असल्याचा पुरावा .

7 संस्थेचे / संस्थाचालकाचे पॅन कार्ड .

8 संस्था स्थानीक ( अमरावती मनपा क्षेत्र ) असल्याचा पुरावा.

9 संस्था कमीत कमी 3 वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत असल्याचा पुरावा.

10 प्रशिक्षण केंद्राचा जीओ टॅग फोटो.

11 शासकीय विभागात महिला/ मुलींकरीताचे वाहन प्रशिक्षणाचे कार्य यशस्वीपणे पुर्ण केल्याचे अनुभव प्रमाणपत्र ( 5 वर्षाचे आतील )

12 प्रस्तावीत प्रशिक्षणाचे सविस्तर नियोजन .( प्रशिक्षण कालवधी, स्वरुप, प्रात्यक्षीक , देण्यात येणारे प्रमाणपत्र )

13 संस्था कोणत्याही शासकीय कार्यालयाकडुन काळया यादीत नसल्याचे व या निवीदेसोबत जोडलेली कागदपत्रे खोटी व असत्य नसल्याचे 100/- रु स्टॅम्प पेपरवर शपथपत्र.

वरील सर्व कागदपत्रांची एकच PDF फाईल निवीदा भरतेवेळी जोडणे आवश्यक राहील . त्याशिवाय B-2 उघडण्यात येणार नाही. व संबंधीतांची निवीदा अपात्र ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहिल

अटी व शर्ती :-

1. सदर प्रशिक्षण योजना महिला बालकल्याण करीता राखीव मनपा स्वनिधी अंतर्गत प्रस्तावीत आहे.
2. RTO (प्रादेशीक परीवहन अधिकारी ) कार्यालयाचे नियमानुसार व अटी/शर्ती नुसार प्रशिक्षण योजना राबवायच्या आहेत. त्यानुसार सदर योजना निवीदाधारकास राबवावे लागेल.
3. सदर प्रशिक्षण योजना खालील प्रमाणे आहेत.

| योजना क्र | प्रशिक्षणाचे नाव | प्रस्तावीत लाभार्थी संख्या | प्रशिक्षणाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1 | महिला / युवतींकरीता चार चाकी हलके वाहन चालकाचे प्रशिक्षण व अनुज्ञाप्ती देणे. | 50 | ➢ किमान 30 दिवस प्रात्यक्षीक व लेखी प्रशिक्षण देणे. ( किंवा अभ्यासक्रमानुसार ) |

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com
Scanned with OKEN Scanner

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ➢ हलके वाहन चालविणेचे शिकाऊ अनुज्ञाप्ती (LLR) काढुन देणे.<br>➢ हलके वाहन चालविणेचे पक्के अनुज्ञाप्ती (DLR) काढुन देणे.<br>➢ इतर अनुषांगीक सर्व बाबी. |
| 2 | महिला / युवतींकरीता चार चाकी जड वाहन चालकाचे प्रशिक्षण व अनुज्ञाप्ती देणे. | 50 | ➢ किमान 30 दिवस प्रात्यक्षीक व लेखी प्रशिक्षण देणे. (किंवा अभ्यासक्रमानुसार)<br>➢ जड वाहन चालविणेचे शिकाऊ अनुज्ञाप्ती (LLR) काढुन देणे.<br>➢ जड वाहन चालविणेचे पक्के अनुज्ञाप्ती (DLR) काढुन देणे.<br>➢ इतर अनुषांगीक सर्व बाबी. |
| 3 | महिला / युवतींकरीता तीन चाकी वाहन ( ॲटो )चालकाचे प्रशिक्षण व अनुज्ञाप्ती देणे. | 50 | ➢ किमान 30 दिवस प्रात्यक्षीक व लेखी प्रशिक्षण देणे. (किंवा अभ्यासक्रमानुसार)<br>➢ ॲटो वाहन चालविणेचे शिकाऊ अनुज्ञाप्ती (LLR) काढुन देणे.<br>➢ ॲटो वाहन चालविणेचे पक्के अनुज्ञाप्ती (DLR) काढुन देणे.<br>➢ इतर अनुषांगीक सर्व बाबी. |

वरील नमुद योजना प्रशिक्षणर्थींना प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावीत आहे. परंतु संख्या कमी वा जास्त करण्याचे सर्व अधिकार महानगरपालिकेस राहील . त्यानुसार निवीदाधारकास प्रशिक्षण राबवावे लागेल.

4. मनपा क्षेत्रातील मुली / युवतींना सदर प्रशिक्षण योजना असल्याने त्यांना प्रशिक्षण देण्याची सर्व यंत्रसामुग्री व साहीत्यासह अनुषांगीक व्यवस्था निवीदाधारकास करावी लागेल.
5. निवीदा स्वीकृत झाल्यावर प्रशिक्षणाचा आदेश दिल्यानंतर या कार्यालयामार्फत प्रशिक्षणार्थी यादी पुरविण्यात येईल. सदर यादी मधील लाभार्थ्यांना प्रवेश दिल्याची माहिती या कार्यालयाला सादर करणे निवीदाधारकास बंधनकारक राहील.व वेळोवेळी अहवाल सादर करावा लागेल.
6. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व सराव कालावधी कार्यालयाने ठरवून दिल्या प्रमाणे असावा. त्यानुसार प्रशिक्षण द्यावे लागेल.
7. प्रती प्रशिक्षणार्थी सर्व खर्चासह दर सादर करावे. ज्यात सर्व खर्च व शासकीय करांचा समावेश असावा. त्याव्यतीरीक्त मनपा देयक देणार नाही.
8. प्रवेशीत विद्यार्थी पैकी कायम अनुज्ञाप्ती (पक्के लायसन) प्राप्त् झालेल्या विद्यार्थी संख्येनुसार व मंजुर प्रशिक्षण शुल्क दरानुसार संस्थेचे देयक देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
9. मंजुर झालेले दर करारनाम्याचे दिनांकापासुन पुढे 1 वर्षाकरीता निवीदाधारकास लागु राहील. मनपा आदेशीत करेल त्या संख्येत कार्य करणे बंधनकारक राहील.
10. प्रशिक्षणार्थी संख्या कमी वा जास्त होवु शकेल. त्यानुसार मनपा आदेशीत करेल त्यानुसार व संख्येत प्रशिक्षण राबविणे निवीदाधारकास बंधनकारक राहिल.
11. सदर प्रशिक्षण योजना मुली व युवतींकरीता असल्याने त्यांची विशेष जबाबदारी घेणे निवीदाधारकास बंधनकारक राहिल. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com
Scanned with OKEN Scanner

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com

12. सदर लाभार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर 1 आठवडापर्यंत जर लाभार्थी प्रशिक्षणाकरिता आलेला नसेल किंवा कोणतीही पूर्व सूचना दिलेली नसेल अश्या लाभार्थ्यांची नावे त्वरित या कार्यालयास कळविण्याची जबाबदारी संबधित संस्थेची राहील.
13. प्रशिक्षणार्थींची उपस्थिती संबंधित हजेरी पट , जीओ टॅग फोटो संस्थेला या कार्यालयात पाठविणे बंधनकारक राहील या कार्यालयात प्रशिक्षणार्थीचे हजेरी पट अप्राप्त असल्यास सदर संस्थेचे देयक अदा करण्यात येणार नाही.
14. प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर देयक सादर करतेवेळी दोन प्रतीत देयक , हजेरी पत्रक, फोटो, प्रशिक्षणार्थी यादी ( हार्ड व सॉफट कॉपी ) , वाहन चालविणेचे पक्के अनुज्ञाप्ती (DLR) पत्राची प्रत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय देयक प्रस्तावीत करण्यात येणान नाही.
15. निवीदा मंजूर केलेल्या संस्थेला वरील शर्ती व अटी मान्य असल्याबाबत नियमानुसार आवश्यक किमतीचे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
16. निवीदा मंजूर केलेल्या संस्थेला एकुण मंजुर प्रकल्प खर्चाच्या 3 टक्के सुरक्षा रक्कम विहीत पद्धतीनुसार जमा करणे बंधनकारक राहील. सुरक्षा रक्कम जमा न केल्यास किंवा काम करण्यास टाळाटाळ केल्यास / असमर्थता दर्शवील्यास निवीदा सादर करतेवेळी भरलेली बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.
17. कोणत्याही प्रकारचे अग्रीम मनपा देणार नाही. वा संस्थेची विनंती विचारात घेतली जाणार नाही.
18. प्रशिक्षणादरम्यान तक्रारी / नुकसान झाल्यास मनपा जबाबदार राहणार नाही. तसेच सदरचा कंत्राट अहस्तांतरणीय असुन अर्धवट सोडता येणार नाही. तसे झाल्यास सुरक्षा रक्कम जप्त करण्याचे अधिकार मा आयुक्त यांना राहील.
19. अटी असलेल्या निवीदा अमान्य असतील.
20. निवीदा बाबत काही वाद निर्माण झाल्यास न्यायालयीन मर्यादा अमरावती राहील.
21. वरील अटी / शर्तीमध्ये बदल करण्याचा , 1 अथवा जास्त निवीदा स्वीकारण्याचा , कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निवीदा नाकारण्याचा , कोणत्याही टप्प्यात निवीदा प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकार मा आयुक्त यांना राहील.
22. अधिक माहिती करीता महिला व बालविकास विभागास कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

महिला व बालविकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

विशेष कार्य अधिकारी
महानगरपालिका अमरावती

tenders time
grow your business rapidly
Contact for Tender Filling and Documentation
Mob No.: +91 - 9630030343
Helpline: - 18008892553
Email ID:- proposal@tenderstime.com
Website:- www.tenderstime.com

Scanned with OKEN Scanner